ANNEXURE – I

# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

## Nursing Faculty

## Information of Subject-wise Intake as per College & University Recognition, Permitted Seat Matrix Chart Academic Year - 2023-2024

**Name of the College:- Samarth Nursing College, Akola**

| UG Degree / PG Degree | Intake as per University / Council | Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio(1:5) |
|---|---|---|
| | Degree | Degree |
| UG Degree : B.Sc (Nursing) | 30 | NA |
| P.B.B.Sc (Nursing) | 50 | NA |
| PG Degree : M.Sc (Nursing) | NA | |
| Medical Surgical Nursing (Fundamental Nursing + Nutrition) | NA | |
| Community Health Nursing | NA | |
| Obstetric and Gynecological Nursing | NA | |
| Child Health Nursing | NA | |
| Psychiatric Nursing / Mental Health Nursing | NA | |

Any Other, Please Specify:
…………………………………………………………………………………………………………
…………………………………………………………………………………………………………
……………………………………………………………………………

Date : _____/_____ 20_____

Dean / Principal Stamp & Signature

Principal
Samartn Nursing College
Ranpise Nagar, Akola.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
MUHS
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) (0253)-2539198,200,268,307 ☎ Student Helpline: (0253)-2539111/6659111
E-mail : academic2@muhs.ac.in Web.: www.muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र), डी.एन.बी., एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S., M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

Out No.: MUHS/Acad/E6-UG/155122/2535 /2022

Date: 30 /11/2022

To,
The Principal,
Shri Samarth Shikshan Krida Prasarak Mandal
Samarth Nursing (B.Sc.) College,
Near Bara Jyotirling Mandir, Ranpise Nagar,
Akola - 444 005

**Sub.:** Continuation / Extension of Affiliation for Academic Year 2022-23
(Issued under provision No. 05 & 13 of University Direction No. 02/2016)

**Ref.:** Academic Council Resolution No. 48/2022 dated 20/09/2022

Sir / Madam,

With reference to above cited subject, I am directed to communicate that as per Academic Council Resolution No. 48/2022 dated 20/09/2022 and as per your proposal of Continuation of Affiliation/Extension of Affiliation, the Academic Council has unanimously resolved to grant Continuation of Affiliation / Extension of Affiliation for Academic Year 2022-2023 as per the provision u/s 68 and 65 (4) of MUHS Act 1998, for the Nursing (Under Graduate) **B.Sc. Nursing & Post Basic B.Sc. Nursing** course of your college.

(a) The intake capacity of students shall be **B.Sc. Nursing – 30 & P.B.B.Sc. Nursing - 50**
(b) It is mandatory to obtain the State Government permission as per GR dated 28/02/2018 (as applicable).
(c) Fulfillment of following deficiencies shall be strictly complied within 3 months, with fail.

(i) Teaching Staff:

| Year | Prof. cum Principal | | | Prof. cum Vice Principal | | | Professor | | | Reader/Asso. Professor | | | Lecturer | | | Tutor/Clinical Instructor | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| First to Final Year | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D |
| | 01 | 01 | - | 01 | 01 | - | - | - | - | 02 | 02 | - | 04 | 04 | - | 16 | 15 | 01 |

Req. : Indicates no. of required teaching staff as per Council norms.
Ext. : Indicates no. of Existing approved teaching staff.
Def. : Indicates no. of deficit teaching staff as per Council norms.

P.T.O

Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

(ii) Deficiencies for compliance :

(a) Deficient teaching staff to be appointed and approval shall be taken from the University.

(b) It is mandatory for college to approve advertisement from the Special Cell of MUHS. Any advertisement, prior to Year 2019, will not be permitted for recruitment process.

(iii) Other :- Fees ................../-, Fine/Penalty ................../- (if any pending with College)

**(iv) Other:**

The College shall submit Affidavit in the prescribed format as per Academic Council's Resolution No. 229/2013 (format attached).

In view of above, I am directed to inform you that this is provisional affiliation to your college and as such you are requested to comply with the above mentioned deficiencies within the stipulated time without fail and submit compliance report. Compliance report will be verified by the University by re-inspection of your college.

Important Note:

1) Although the Continuation / Extension of Affiliation is granted to your College for the Academic Year 2022-23. You are not allowed to admit students for First Year Nursing Course without receipt of permission from State Government (as applicable).

2) In case of any irregular admissions, University shall not be responsible for any academic or pecuniary loss or damages of the concerned.

3) The admission shall be done through the Competent Authorities only.

Thanking you.

30-11-22

Registrar

Copy to:-

1. The Competent Authority, Admission Regulating Authority, Mumbai.
2. The Controller of Examinations, M.U.H.S., Nashik.
3. The Dy. Registrar, Eligibility Dept., M.U.H.S., Nashik.
4. The HOD, Computer Dept., M.U.H.S., Nashik.

Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

for. P. Sheema
Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

G.R. B.Sc(N)

**बी.एस्सी. शुश्रूषा अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्याबाबत...**
**श्री. समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, अकोला**

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एनयुआर-२०१२/प्र.क्र.६१/१२/शिक्षण-१
९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक: 12 17 AUG 2015

वाचा : १. शासनाचे समक्रमांकीत दिनांक ३०/११/२०१३ चे आवश्यकता प्रमाणपत्र.
२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्रमांक मआविवि/पीबी/युजी/नर्सिंग/कर्न्से/२८८/२०१५, दिनांक २५/०३/२०१५
३. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक फाईल क्रमांक०२/जुलै/२०१५, दिनांक १६/०७/२०१५

**प्रस्तावना:**

**श्री. समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, अकोला** येथे ३० (तीस) विद्यार्थी क्षमतेसह बी.एस्सी. शुश्रूषा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संदर्भ क्रमांक (१) अन्वये "आवश्यकता प्रमाणपत्र" देण्यात आले होते. त्यानुषंगाने संदर्भ क्रमांक (२) नुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने शासन मान्यतेनंतर निरिक्षण करून सदर अभ्यासक्रमाकरिता संलग्निकरण देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे नमूद केले आहे. भारतीय परिचर्या परिषदेने संदर्भ क्रमांक (३) अन्वये संस्थेच्या बी.एस्सी. शुश्रूषा अभ्यासक्रमासाठी ३० (तीस) विद्यार्थी प्रवेशास परवानगी दिली आहे. त्यान्वये उक्त संस्थेस शासन निर्णयाव्दारे बी.एस्सी. शुश्रूषा अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांनी अनुक्रमे दिलेली परवानगी व संलग्निकरण विचारात घेता **श्री. समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, अकोला** या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधिनतेने याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्थी :**

१. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशकरिता राज्यशासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.
२. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्यशासन यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.
३. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
४. महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशन प्रोव्हिविशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.
५. शासकीय नियम / कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
६. संस्था,त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय / दंत / परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्या खेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही याबाबतचे रू.५०/- च्या स्टॅंप पेपर वरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

७. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८. संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

९. संस्थेने बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

१०. सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

११. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नयेत.

१२. संस्थेला गुणवत्तेवरआधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून अथवा तत्सम प्राधिकरण यांच्यकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१३. भारतीय परिचर्या परिषद ,नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ , नाशिक यांची महाविद्यालयास अनुक्रमे मान्यता व संलग्निकरण जोपर्यंत आहे,तोपर्यंत हा शासन निर्णय वैध असेल.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अविअभि

**(अंजली वि. अंभिरे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव, भारतीय परिचर्या परषिद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
६. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण /शिक्षण शुल्क समिती शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
७. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, इएसआयसी रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड, मुंबई ८०.
८. अध्यक्ष/ सचिव श्री. समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, अकोला
९. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई
११. निवडनस्ती (शिक्षण-१).

Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

PBBSC(N)

पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत.

श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, बारा ज्योतिर्लिंग मंदिरा जवळ, रणपिसे नगर, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, रणपिसे नगर, अकोला.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०१६/प्र.क्र.२२/१६/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक:-१३ ऑगस्ट, २०२१.

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/ पीबी/युजी/१४९०/२०१५, दिनांक १९.१२.२०१५.
२) शासनाचे समक्रमांकाचे आवश्यकता प्रमाणपत्र दि.३१.०३.२०१६.
३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, २०१८.
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र. एनयुआर/ श्री भा बाठे नर्सिंग कॉलेज/अकोला/पी.बी.बी.एस्सी/तपासणी अहवाल/ई/खाजगी/७९९८/२०२१, दि.०७.०५.२०२१.

प्रस्तावना:

श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, बारा ज्योतिर्लिंग मंदिरा जवळ, रणपिसे नगर, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, रणपिसे नगर, अकोला या संस्थेचा पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.(२) नुसार सदर संस्थेला दि.३१.०३.२०१६ रोजी आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात आले आहे. संस्थेने प्रस्ताव भारतीय परिचर्या परिषदेच्या मान्यतेसाठी सादर केला होता. तथापि, भारतीय परिचर्या परिषदेचे संस्थेच्या मान्यतेचे अधिकार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.११.०९.२०१७ रोजीच्या निर्णयानुसार संपुष्टात आले होते.

२. तद्नंतर, संबंधित संस्थेच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र.(३) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(४) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. सक्षमता तपासणी समिती व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांची शिफारस

Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

सक्षमता तपासणी समिती व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांची शिफारस विचारात घेऊन, श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, बारा ज्योतिर्लिंग मंदिरा जवळ, रणपिसे नगर, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, रणपिसे नगर, अकोला या संस्थेस सन २०२१-२२ साठी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम /अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय/ दंत /परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने प्रथम तुकडी बाहेर पडेपर्यंत दरवर्षी शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

१०) संस्थेने पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

१२) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण अथवा तत्सम प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ श्री.पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
१०. शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा(पू), मुंबई-४०००५१
११. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१२. अध्यक्ष/सचिव, श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, बारा ज्योतिर्लिंग मंदिरा जवळ, रणपिसे नगर, अकोला-४४४००१.
१३. अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवडनस्ती (शिक्षण-१).

Principal
Samartn Nursing College
Ranpise Nagar, Akola.

श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, अकोला या संस्थेच्या महाविद्यालयाचे नाव बदलण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एनयुआर-२०२१/प्र.क्र.३६५/२१/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ३० नोव्हेंबर, २०२१.

वाचा :- १. शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१२/प्र.क्र.६२७/१२/शिक्षण-१, दि.१२.०५.२०१३.
२. शासन निर्णय क्र. एनयुआर-२०१६/प्र.क्र.२२/१६/शिक्षण-१, दि.१३.०८.२०२१.

प्रस्तावना :-

श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, अकोला पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, अकोला हे महाविद्यालय श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला या संस्थेच्या अंतर्गत होते. संस्थेने सदर महाविद्यालयाच्या नावामध्ये **"श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, अकोला ऐवजी बदलून श्री समर्थ शिक्षण व क्रिडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, अकोला"** याप्रमाणे बदल करण्याची विनंती केली होती. त्यानुसार संस्थेच्या नावात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित श्री. भास्कररावजी बाठे नर्सिंग कॉलेज, अकोला पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे नाव **"श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, अकोला"** असे करण्यास खालील अटीच्या अधीन शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तसेच महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

२) संस्थेच्या रुग्णालयातील रुग्णांच्या व रुग्णालय प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

३) संस्थेच्या स्थावर जंगम मालमत्तेस तसेच इतर मिळकतीवर कोणत्याही प्रकारची गदा येणार नाही.



Principal
Samarth Nursing College
Ranpise Nagar, Akola.

Scanned with CamScanner

४) संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात वरीलप्रमाणे बदल केल्यामुळे या संदर्भात भविष्यात कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ.श्रीनिवास पु. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. सचिव, प्रवेश नियामक अधिकारी, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डिंग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
१०. सचिव, शुल्क नियामक अधिकारी, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
११. सचिव, श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, रणपीसे नगर, अकोला.
१२. अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).

Principal
Samartn Nursing College
Ranpise Nagar, Akola.

Scanned with CamScanner